वर्ष-०७ अंक-२६ मुंबई, मंगळवार १८ ते २४ मे २०२१ पृष्ठ-४
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र
संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक

PG 2 खळबळजनक घटना! 'तो' राग मनात धरून मुलाने केला वडिलांचा खून
3 → अशोक चव्हाण निष्क्रिय आणि नाकर्ते; सदाभाऊ खोत यांचा जोरदार हल्लाबोल
बीकेसी कोविड सेंटरला तौक्ते वादळाचा तडाखा, पालिकेने रातोरात रुग्णांना हलवल्याने .. ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## 'भाईला उलट उत्तर देतो' म्हणत, कोविड सेंटरमध्ये गुंडाचा हैदोस




नागपूरः आयसोलेशन हॉस्पिटलमध्ये असलेल्या कोव्हिड केअर सेंअरमध्ये गुन्हेगारांच्या टोळीने हैदोस घालून तोडफोड केली. ही घटना रविवारी सायंकाळी ...पान २ वर...

## शेततळ्यात बुडून दोन तरुणांचा मृत्यू



शेततळ्यात बुडून दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची ...पान २ वर...

# वर्गीकरण करून रुग्णांवर उपचार करा!

## करोना कृतिदलाचे 'माझा डॉक्टरां'ना मार्गदर्शन

मुंबई : लक्षणांनुसार रुग्णांचे योग्य वर्गीकरण झाल्यास वेळेत योग्य उपचार करणे शक्य होते. अनाठायी, अनावश्यक उपचार करू नका आणि करोनातून बरे झालेल्या रुग्णांवरही बारकाईने लक्ष ठेवा, असा सल्ला 'माझा डॉक्टर' या उपक्रमात कृतिदलाच्या तज्ज्ञांनी डॉक्टरांना दिला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या 'माझा डॉक्टर' संकल्पनेतून रविवारी राज्यभरातील डॉक्टरांसाठी दूरचित्रसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कृतिदलाचे प्रमुख डॉ. संजय ओक, डॉ. राहुल पंडित, डॉ. शशांक जोशी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक डॉ. तात्याराव लहाने आणि कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. आशिष भूमकर यांनी राज्यातील सुमारे २२ हजार फॅमिली फिजिशियन




आणि वैद्यकीय चिकित्सकांना मार्गदर्शन केले.

'रुग्ण प्रथम त्यांच्या डॉक्टरकडे (फॅमिली डॉक्टर) जातात. रुग्णांना करोनासदृश्य कोणतीही लक्षणे असल्यास तातडीने 'आरटीपीसीआर' चाचणी करून घेणे गरजेचे आहे. सिटी स्कॅनमध्ये फुफ्फुसांवर परिणाम झाल्याचे दिसत असले तरी संसर्गाची तीव्रता धोकादायक आहे असे नाही. त्यामुळे सिटीस्कॅन ही निदान करणारी चाचणी नाही. 'आरटीपीसीआर'ला पर्याय नाही. गृहविलगीकरणातील रुग्णांवर उपचार करताना डॉक्टरांनी नियमितपणे फोन किंवा व्हिडिओच्या माध्यमातून संवाद साधावा, अशी सूचना डॉ. ओक यांनी केली. तसेच रुग्णाला पहिल्या आठवड्यात फारसा त्रास होत नाही, परंतु दुसऱ्या आठवड्यात त्याची लक्षणे तीव्र होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे डॉक्टरांनी गृहविलगीकरणातील रुग्णांवर देखरेख ठेवणे गरजेचे आहे', असे डॉ. ओक यांनी सांगितले.

कोणत्या रुग्णांला घरीच उपचार द्यावेत, कोणत्या रुग्णाला रुग्णालयात दाखल करावे, कोणत्या रुग्णांची स्थिती धोक्याच्या पातळीवर आहे असे वर्गीकरण करताना लक्षणे काय आहेत, हे पाहावे. कोणताही अन्य जीवाणूजन्य संसर्ग नसल्यास कोणत्याही प्रतिजैविकांचा वापर करू नये. गृहविलगीकरणातील रुग्णांवर स्टिरॉईडचा वापर करू नये. हायड्रॉक्सीक्लोरोक्वीन आणि रक्तद्रव उपचार करू नयेत. यामुळे कोणताही फायदा होत नसल्याचे दिसून आले आहे. रुग्णाला लक्षणे आल्यावर तीन दिवसांत ...पान २ वर...

## आदित्य ठाकरेंची पालिकेच्या कंट्रोल रुमला भेट; परिस्थितीचा घेतला आढावा



अरबी समुद्रात घोंघावणाऱ्या 'तोत्के' चक्रीवादळाचा तडाखा मुंबईला बसला आहे. मुंबईतील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे मुंबई महानगरपालिकेच्या कंट्रोल रुमला भेट दिली. यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी गरज असेल तरच घराबाहेर पडा, असं आवाहन आदित्य ठाकरेंनी कलं आहे.

आदित्य ठाकरेंनी कंट्रोल रुमला भेट दिली.

यानंतर आदित्य ठाकरेंनी माध्यमांशी संवाद साधला. मुंबईत अनेक ठिकाणी झाडं पडली असून नुकसान झालं आहे, असं ठाकरे म्हणाले. याशिवाय, ३ जम्बो कोविड सेंटरमधून रुग्णांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे, अशी माहिती आदित्य ठाकरेंनी दिली. यावेळी त्यांनी नागरिकांना घरी राहण्याचं आवाहन केलं आहे. विनाकारण घराबाहेर पडू नका, सर्व नागरिकांनी सावध राहावं, असं आवाहन आदित्य ठाकरेंनी केलं. पुढे बोलताना त्यांनी तौक्ते चक्रीवादळ गुजरातच्या दिशेनं सरकत असल्याची माहिती दिली. यावेळी त्यांनी केंद्र सरकार आणि राज्य सरकार एकमेकांच्या संपर्कात असल्याचं आदित्य ठाकरे म्हणाले.१६० मिमी पाऊस, १२० मिमी पाऊल तो ही वादळीवाऱ्यासह होतोय, मनुष्यहानी काही होणार नाही, याची काळजी घेत आहोत, हाय टाईड आहे,

## अवघ्या 13 वर्षाच्या मुलावर 'जम्बो'त यशस्वी उपचार



अवघ्या १३ वर्षांच्या मुलाला करोनाने गाठले. त्याची प्रकृती गंभीर बनली. पालकांनी सर्व प्रयत्न करूनही कुठेही लहान मुलांसाठीचा आयसीयू उपलब्ध झाला नाही. शेवटी पालकांनी महापालिकेच्या शिवाजीनगर येथील जम्बो रुग्णालयात त्याला भरती केले. तिथे त्याच्यावर यशस्वी उपचार झाले आणि रविवारी तो सुखरूप घरी परतला.

मूळच्या करमाळा येथील १३ वर्षांच्या आदित्य सोनावणेची प्रकृती बिघडल्याने त्याला श्वास घ्यायला त्रास होत होता. त्याचे पालक त्याच्यासाठी खाट शोधत होते. शहरभर प्रयत्न करूनही खाट मिळाली नाही. पालक शेवटी शिवाजीनगर येथील जम्बो रुग्णालयात ...पान २ वर...

# चक्रीवादळामुळे मुंबईत समुद्र खवळला

मुंबई : चक्रीवादळामुळे मुंबईत सकाळपासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. वादळी वाऱ्यासह अनेक ठिकाणी झाडं कोसळल्याची माहितीही देण्यात आली आहे. तौक्ते चक्रीवादळ हे आता मुंबईच्या अगदी जवळ असल्यामुळे समुद्रही खवळला आहे. याचाच एक काळजाचा ठोका चुकवणारा व्हिडिओ समोर आला आहे.

हा व्हिडिओ गेट वे ऑफ इंडिया या परिसरातला आहे. समुद्र खवळला असून मोठ्या लाटा समुद्रात





उसळल्या आहेत. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे परिसरात लावलेले बॅरिगेट्सही पडले आहेत. तर अनेक ठिकाणी झाडं कोसळली आहेत. तुम्ही या व्हिडिओमध्ये पाहू शकता कशा प्रकारे या चक्रीवादळाने रौद्ररुप धारण केलं आहे.

दरम्यान, या चक्रीवादळाच्या प्रभावामुळे मुंबईत मध्यरात्रीपासूनच वादळी वाऱ्यासह पावसाला सुरूवात झाली आहे. त्यामुळे मुंबईकरांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मुंबई ऑरेंज अलर्ट

तौक्ते चक्रीवादळाचा मुंबईला कोणताही धोका नसला तरी हवामान विभागानं मुंबई व परिसराला ऑरेंज अलर्ट दिला आहे. मुंबईला वादळाचा धोका नसला तरी हे चक्रीवादळ मुंबईनजीकच्या ...पान २ वर...

## औरंगाबाद । पिंप्रीराजाच्या तरुणाचा मृतदेह आढळला



तालुक्यातील आळंद येथील एका विहिरीत तरुणाचा मृतदेह सापडला असून, हा तरुण पिंप्रीराजा (ता. औरंगाबाद) येथील आहे. हा मृत्यू आकस्मिक की घातपात याबाबत तर्कवितर्काला उधाण आले आहे.

प्रल्हाद भाऊसाहेब घोरपडे (वय ४०, रा. पिंप्रीराजा ता. औरंगाबाद) असे मृत तरुणाचे नाव आहे. वडोद बाजार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आळंद येथील शेतकरी खंडू तायडे यांच्या शेतात घोरपडे यांच्या विहिरीत मृतदेह सापडला. ग्रामस्थांनी व पोलिसांनी याबाबत सोशल मिडीयावर याबाबत माहिती टाकली होती ...पान २ वर...















तोक्ते चक्रीवादळामुळे मीरा भाईंदर परिसरातील विविध ठिकाणे सोसाट्याचा वारा मोठ्या प्रमाणात आल्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली काहींच्या घरावरील छपरे उडाली मिरा रोड रेल्वे स्टेशन परिसरात एस के स्टोन, तसेच बीपी रोड ,नवघर रोड, ठिकाणे गुडघाभर पाणी भरले .गेले एकीकडे कोरोना मुळे सर्व बंद असल्यामुळे कुठेही जीवित हानी झाली नाही

# खळबळजनक घटना! 'तो' राग मनात धरुन मुलाने केला वडिलांचा खून



फुलंब्री : वडील नेहमी लहान भावाची बाजू घेतात आणि शेतामध्ये त्यालाच मदत करतात, या रागातून मुलानेच वडिलांचा खून केला. ही घटना मुर्शिदाबाद वाडी (तालुका फुलंब्री) येथे गुरुवारी मध्यरात्री घडली. मोठ्या मुलाने कबुली दिल्यानंतर त्याला अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परसराम अप्पा पवार (वय ६५) असे मृत व्यक्तीचे नाव असून, रोहिदास (वय ३२) असे आरोपी मुलाचे नाव आहे. परसराम हे चौका येथे नशा करण्यासाठी गेले होते. तेथून त्यांना आणताना रोहिदासची त्याच्या वडिलांशी झटापट झाली. त्यात ते खाली पडून डोक्यात दगड मारले. यातच त्यांचा मृत्यू झाला. स्थानिक गुन्हे शाखा व पोलिसांनी तपास सुरू असताना संशय रोहिदासवर गेला. त्याच्या बोलण्यात एक वाक्यता नसल्याने त्यास पोलीस ठाण्यात आणले असता. त्याने पूर्णपणे कबुली जबाब दिला. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक मुगदीराज तपास करीत आहेत.

# उल्हासनगर महापालिकेची ३५ लाखांची दंडवसुली




उल्हासनगर शहरात करोना प्रतिबंधक नियमांची अंमलबजावणी न करणाऱ्यांविरोधात महापालिका अधिकाऱ्यांनी राबवलेल्या दंडात्मक कारवाईत गेल्या तीन महिन्यांत ३४ लाख ८५ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. यात मास्क न वापरता सार्वजनिक ठिकाणी वावरणाऱ्या नागरिकांकडून १५ लाखांचा तर विवाह कार्यालय आणि नियम मोडणाऱ्या व्यापाऱ्यांकडून १९ लाखांचा दंड प्रभाग अधिकाऱ्यांनी वसूल केला आहे. मात्र महापालिकेकडून हजारो नागरिकांवर रोज कारवाईची मोहीम सुरू असतानाही, शहरातील गर्दीवर मात्र नियंत्रण होताना दिसत नाही. राज्य सरकारने लॉकडाउन लागू केल्यानंतरही उल्हासनगर शहरातील विविध बाजारपेठा आणि रस्त्यांवर गर्दी पहायला मिळत आहे. त्यात कपडे, घरगुती साहित्याच्या दुकानांना विक्री करण्यास बंदी असतानाही, छुप्या पद्धतीने शेकडो व्यापारी व्यवसाय सुरू ठेवल्याचे प्रकार समोर आले आहेत. त्यामुळे शहरातील संसर्ग रोखण्यासाठी आणि करोना नियमांची कडक अंमलबजावणी करण्यासाठी महापालिकेने प्रभाग अधिकारी आणि अन्य पथकांच्या माध्यमातून शहरात कारवाईची मोहीम राबवली जात आहे. यात महापालिकेने दिलेल्या आकडेवारीनुसार, २३ फेब्रुवारी ते ११ मेपर्यंत शहरातील विविध भागांत सार्वजनिक ठिकाणी विनामास्क वावरणाऱ्या एकूण सात हजार ४६१ नागरिकांवर दंडात्मक कारवाई केली आहे. यातून १५ लाख ३१ हजार ३०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तर, याच कालावधीत शहरातील विविध सभागृहांमध्ये आयोजित लग्न समारंभ तसेच अन्य कार्यक्रमांत गर्दीचे नियम मोडल्याप्रकरणात ४३ सभागृहांतून ५० हजारांचा दंड वसूल केला आहे. तर, शहरातील विविध बाजारपेठांमध्ये करोना नियमांची अंमलबजावणी न करता, निश्चित वेळेनंतरही दुकाने सुरू ठेवणे, परवानगी नसताना छुप्या पद्धतीने दुकान सुरू ठेवत व्यवसाय करणे अशा एकूण ८६८ दुकानांवर या तीन महिन्यांत कारवाई करत त्यांच्याकडून एकूण १९ लाख तीन हजार ७९९ रुपयांचा दंड वसूल केल्याची माहिति प्रभाग अधिकारी गणेश शिंपी यांनी दिली आहे.

# सोलापूरमध्ये धुमाकूळ घालणाऱ्या कुख्यात गुंडाला अटक; थेट येरवडा जेलमध्ये रवानगी



सोलापूर : शहरातील पाच पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार भरत किसन मेकाले याला सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या पोलिसांनी एमपीडीए कायद्यानुसार १३ मे रोजी स्थानबद्ध केले असून त्याची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली आहे.

भरत मेकाले हा सावकारी व्यवसाय करीत होता आणि लोकांकडून तसेच व्यापाऱ्यांकडून १५ ते २० टक्क्यांपर्यंत व्याज घेत असल्याची तक्रार विविध पोलिस ठाण्यात दाखल होती. घातक शस्त्रानिशी हल्ला करणे, खंडणी मागणे, दुखापत करणे, जबरी चोऱ्या करणे, टोळी जमवून गैरकृत्य करणे अशा विविध गंभीर गुन्ह्यांसाठी ओळखला जात होता. त्यामुळे पोलीस त्याचा शोध घेत होते. मेकाले याने सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा निर्माण केली असल्याचे लक्षात आल्यामुळे त्याच्याविरुद्ध २०१९ व २०२० मध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मेकाले याच्याविरुद्ध जमीन बळकावणे यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे देखील दाखल करण्यात आले. गुंड भरत मेकाले याच्याविरुद्ध वेळो-वेळी कार्यवाही करूनही वर्तनात सुधारणा न झाल्याने एमपीडीए अधिनियम १९८१ अन्वये स्थानबद्धतेचे आदेश काढण्यात आले होते. त्यानंतर अखेर त्याची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली आहे.

# वादग्रस्त अॅट्रॉसिटी प्रकरण · तब्बल 12 वर्षानंतर एकाच कुटुंबातील 7 जणांची निर्दोष मुक्तता



सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील खेडभाळवणी ता. पंढरपूर येथे दिनांक २९ जुलै २००९ रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास जमिनीलगतचा शेतकरी कोंडीबा तुकाराम बनसोडे यास जातीवाचक शिवीगाळ आणि त्याच्या कुटुंबातील लोकांना मारहाण केल्याच्या आरोपातून राजेंद्र बाबासाहेब जगन्नाथ साळुंखे रा. खेडभाळवणी यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील ३ महिलांसह ७ जणांवर अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र या प्रकरणी आज पंढरपूर सत्र न्यायालयाने साळुंखे कुटुंबातील सातही जणांची निर्दोष मुक्तता केली आहे.

'फिर्यादीच्या भावाने घटनेच्या दिवशी आरोपीच्या घरातील एका महिलेचा विनयभंग केला होता. त्या घटनेला शह देण्यासाठी आरोपींना अॅट्रॉसिटी प्रकरणात खोटेपणाने गुंतविले आहे. अॅट्रॉसिटी कायद्याच्या कसा दुरुपयोग केला जातो, याचा हा खटला म्हणजे मूर्तिमंत उदाहरण आहे,' असा युक्तिवाद आरोपीचे वकील अॅड.धनंजय माने यांनी न्यायालयात केला. विशेष म्हणजे फिर्यादीच्या भावाविरुद्ध करण्यात आलेल्या विनयभंगाच्या खटल्यात त्याने गुन्हा कबूल केला असल्याबाबतची कागदपत्रे आरोपी पक्षातर्फे न्यायालयात सादर करण्यात आली होती. त्यांनतर सर्व युक्तीवाद ऐकून न्यायालयाने पुराव्याच्या आधारे साळुंखे परिवारातील सदस्यांची निर्दोष मुक्तता केली आहे.

# दुसऱ्या लाटेचा एसटीला तडाखा

करोनाची दुसरी लाट थोपवण्यासाठी राज्यात लागू करण्यात आलेल्या कडक निर्बंधांमुळे आर्थिक उलाढालीवर मोठा परिमाण झाला असून अगोदरच मागील वर्षभरापासून आर्थिक तोटा सहन करणाऱ्या एसटीच्या ठाणे विभागाच्या उत्पन्नामध्ये करोनाच्या दुसऱ्या लाटेने अधिकच घसरण झाली आहे. दररोजची ही घसरण सुमारे ३९ लाखांपेक्षा अधिक आहे. केवळ अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी बसेस चालवल्या जात आहेत. त्यामुळे सध्या दररोज सहा ते सात लाखच उत्पन्न मिळत असल्याची माहिती समोर आली आहे. उन्हाळी हंगाम एसटीसाठी फायदेशीर ठरत असला तरी करोनाच्या निर्बंधामुळे दुसऱ्या वर्षीदेखील उन्हाळी हंगामातील उत्पन्नापासून एसटी प्रशासनाला वंचित राहावे लागले आहे. एसटीच्या ठाणे विभागाचे दररोजचे उत्पन्न सुमारे ४८ लाखांच्या आसपास असून करोनाची दुसरी लाट येण्याअगोदर बसेस एक लाख ५८ हजार किलोमीटर धावत होत्या. त्यामुळे प्रवासी वाहतुकीपोटी एसटीला बऱ्यापैकी उत्पन्न मिळत होते. विशेष म्हणजे, उत्पन्न वाढवण्यासाठी एसटी प्रशासनाने विविध मार्गांवर बसेस सोडल्या होत्या. तसेच पॅकेज टूर्सचे नियोजन करण्यात आले होते. या पॅकेज टूर्सला प्रवाशांचा प्रतिसाद मिळाला नसला तरी गेल्या वर्षी दिवाळीमध्ये ठाणे विभागाकडून जादा बसेस सोडण्यात आल्या होत्या. एसटीच्या प्रवासीसंख्येमध्ये वाढ झाल्याने उत्पन्नामध्ये हळूहळू वाढ होऊ लागली होती. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून करोना रुग्णांची संख्या वाढू लागल्याने मार्चपासून पुन्हा एकदा प्रवाशांची संख्या कमी होण्यास सुरुवात झाली. त्या महिन्यांत उत्पन्नामध्ये सुमारे १५ लाखांची घट झाली होती. परिणामी आर्थिक स्थिती अधिकच कमकुवत झाल्याने डिझेल खरेदीची थकबाकीदेखील प्रचंड वाढली. डिझेलच न मिळाल्याने बसेस आगारात उभ्या करून ठेवण्याची नामुष्कीदेखील एसटी प्रशासनावर मार्चमध्ये ओढावली होती.आता करोनाच्या दुसऱ्या लाटेने एसटीचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे शासनाने कडक निर्बंध लादले, तसेच संचारबंदीही आहे. या निर्बंधामुळे सध्या केवळ अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी बसेस चालवल्या जात आहेत. या बसेसची संख्या १०० असून बेस्टतर्फे ७५ बसेस चालत आहेत. अशा एकूण एसटीच्या १७५ बसेस रस्त्यांवर धावत आहेत.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१
संगणक विभाग

MBMC/Computer/ 85 /2021-22 Date: 11 / 05 / 2021

**// First Extension Tender Notice //**

Mira Bhainder Municipal Corporation invites Online tender (GEM/2021/B/1196747) for Supply of Computers, Laptop, DVD & External Hard Disk to MBMC Health department Vide No. MBMC/PRO/63/2020-21 dated 29/04/2021. But due to less response we extend the tender for the same work. The tender form and other relevant document will be available for download on MBMC's E-tendering website https://gem.gov.in till Dt.20/05/2021 at 1.00 p.m. If possible the tenders will be opened in the presence of the bidders or their representative on Dt.20/05/2021 after 1.00 p.m. at the tender cell of Mira Bhainder Municipal Corporation.

Sign/-
(R.M. Gharat)
System Manager
Mira Bhaindar Municipal Corporation

जा क्र./ मनपा/जनसंपर्क/95/2021-22
दि. 11/05/2021


## पृष्ठ १ वरुन

### 'भाईला उलट उत्तर देतो' म्हणत,

इमामवाडा भागात घडली. या घटनेने रूग्ण व त्यांच्या नातेवाइकांमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण असून, काही काळ तणाव निर्माण झाला होता. बादल, रिंकी, डेव्हिड, ललित व त्याचे साथीदार,अशी गुन्हेगारांची नावे असल्याचे कळते. इमामवाड्यातील या हॉस्पिटलमध्ये कोव्हिडकेअर सेंटर आहे. सायंकाळी बादल याचा एक साथीदार जखमी झाला. त्याला घेऊन बादल व अन्य गुन्हेगार तेथे आले. जखमी साथीदारावर तत्काळ उपचार करा, अशी धमकी बादल याने येथील कर्मचाऱ्यांना दिली. हे कोव्हिड केअर सेंटर असून, जखमीला मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये घेऊन जा,असे येथील कर्मचाऱ्यांनी बादल याला सांगितले. बादल व त्याचे साथीदार संतापले. भाईला उलट उत्तर देतो,असे म्हणत बादल व त्याच्या साथीदारांनी सेंटरमध्ये तोडफोड करायला सुरूवात केली. सुमारे २० मिनिटे हॉस्पिटलमध्ये हैदोस घातला. घटनेची माहिती मिळताच इमामवाडा पोलिसांचा ताफा तेथे पोहोचला. पोलिसांना बघताच गुन्हेगार फरार झाले. रात्री पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले होते, अशी माहिती आहे.

### शेततळ्यात बुडून दोन तरुणांचा मृत्यू

घटना शनिवारी दुपारी तीन वाजता वैजापूर तालुक्यातील म्हस्की येथे घडली. रामेश्वर उर्फ योगेश रंगनाथ जगताप (वय २१, रा. सिरसगाव ता. गंगापूर, ह. मु. सटाणा) व बाबासाहेब उर्फ भावराव आप्पासाहेब जाधव (२५, रा. म्हस्की) अशी मृतांची नावे आहेत.

योगेश हा मजुरी काम करण्यासाठी म्हस्की येथे आला होता. तर भावराव हा जागरण गोंधळात काम करणारा कलाकार होता. मात्र, लॉकडाउनमुळे कार्यक्रम बंद असल्याने मजुरी करत होता. दोघांनीही शनिवारी दुपारपर्यंत उसतोडीचे काम केले. काम झाल्यानंतर उन्हाच्या काहिलीमळे ते शेततळ्यावर पोहण्यासाठी गेले. म्हस्की शिवारातील गट नंबर ६६ मधील सुनील घोलप यांच्या शेततळ्यात ते पोहण्यासाठी पाण्यात उतरले. मात्र, पोहता न आल्याने बुडून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. परीसरातील नागरीकांच्या ही घटना लक्षात आल्याने त्यांनी ही घटना पोलिसांना कळवली. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक जगदीश पवार, फौजदार नवनाथ कदम, सहाय्यक फौजदार बी. बी. गायकवाड, दिपक बर्डे यांनी घटनास्थळी जाऊन नागरीकांच्या मदतीने दोन्ही मृतदेह पाण्याबाहेर काढले. दोन्ही मृतदेहाचे वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.या प्रकरणी विरगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार बी. बी. गायकवाड करीत आहेत.

### अवघ्या 13 वर्षांच्या मुलावर

आले. मुलाला कुठेही खाट मिळत नसल्याने आणि प्रत्येक गरजू रुग्णाला जम्बोमध्ये मदत मिळाली पाहिजे, अशा पालिकेच्या सूचना असल्याने डॉ. कपाले यांनी त्याला तेथे दाखल करून घेण्याची जोखीम पत्करली. त्याला १५ लिटर ऑक्सिजनची गरज भासत होती. मात्र, तेथील वैद्यकीय प्रमुख डॉ. श्रेयांश कपाले यांच्यासह वरिष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. प्रतीक कांकरिया यांनी हाय डिपेन्डन्सी युनिटमध्ये त्याच्यावर उपचार सुरू केले. दरम्यानच्या काळातही आदित्यच्या पालकांनी अनेक ठिकाणी लहान मुलांसाठीच्या आयसीयू खाटेचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. मात्र, खाट उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे आदित्यचे सर्व उपचार 'जम्बो'मध्येच झाले आणि तो रविवारी सुखरूप घरी परतला. करोनाच्या तिसऱ्या लाटेचा परिणाम लहान मुलांवर होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेनेही त्यादृष्टीने तयारी सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'सीओईपी'तील जम्बो रुग्णालयात लहान मुलांसाठी हाय डिपेन्डन्सी युनिट (एचडीयू) सुरू करण्यात आले आहे.

### चक्रीवादळामुळे मुंबईत

समुद्रातून जाणार असल्याने त्याच्या प्रभावाने मुंबईत पाऊस होण्यासह वेगाने वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. त्यानुसार मुंबई, ठाणे, पालघरला ऑरेंज अॅलर्ट व तर, रायगडला रेड अलर्ट देण्यात आला आहे. सोमवारी तौक्ते चक्रीवादळाचा रायगड, मुंबई आणि ठाणे जिल्ह्याला समांतर समुद्रातून प्रवास होणार असून, वादळाच्या वाढत्या तीव्रतेमुळे प्रशासनातर्फे या पट्ट्यात रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्याला रेड अॅलर्ट जारी केल्यामुळं जिल्ह्यात अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

### औरंगाबाद · पिंप्रीराजाच्या तरुणाचा

व तरुणाचा मृतदेह फुलंब्री उपजिल्हा रुग्णालयात पाठविला. सोशल मीडियामुळे या तरुणाची माहिती मिळताच नातेवाइकांनी फुलंब्री येथे जाऊन मृतदेहाची ओळख पटवली. घोरपडे हे काही कामानिमित्त सिल्लोड येथे गेले होते. त्यानंतर त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नव्हता. तसेच, त्यांची चारचाकी आळंद परिसरात सापडली होती. प्रल्हाद घोरपडे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली असा परिवार आहे. सहायक पोलिस निरिक्षक आरती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार दत्ता मोरे हे तपास करीत आहेत.

# पुण्यामध्ये नऱ्हेगावात घडली गंभीर घटना! भरचौकात टोळक्याने तरुणावर कोयत्याने केले सपासप वार

धायरी : नऱ्हेगावात एका अज्ञात टोळक्याने तरुणावर कोयत्याने सपासप वार केले असून यामध्ये सुमित नाना वैराट हा तरुण गंभीर जखमी झाला आहे. त्याला तत्काळ उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हि घटना रविवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास झिल कॉलेज चौकात घडली. नऱ्हेगावातील झील कॉलेज चौकातील रस्त्यावर सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास सात ते आठ तरुणांनी एकत्र जमून एका तरुणावर कोयत्याने सपासप वार केले. वार झाल्यानंतर इमारतीत असणाऱ्या एका व्यक्तीने जखमी तरुणाला घरात घेऊन दरवाजा लावल्याने त्या जखमी तरुणाचा जीव वाचला असून त्याला उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर आरोपी पसार झाले आहेत. दोन गटातील वादातून ही घटना घडली असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.घटनेचे वृत्त समजताच सिंहगड रस्ता पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) प्रमोद वाघमारे, पोलीस उपनिरीक्षक नितीन जाधव, उपनिरीक्षक कुलदीप संकपाळ कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले असून आरोपींच्या शोधार्थ पथके रवाना झाली आहेत. भर चौकात ही घटना घडल्याने नागरिकांत घबराटीचे वातावरण पसरले आहे.

# राज्याची यंत्रणा सज्ज!


मुंबई : अरबी समुद्रातील तौक्ते चक्रीवादळामुळे सागरी किनाऱ्यांवरील जिल्ह्यांमध्ये सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे. किनारपट्टी भागात ९०० टन क्षमतेचे प्राणवायू निर्मिती प्रकल्प असून त्यांच्या सुरक्षिततेचे आव्हान लक्षात घेऊन त्यासाठी तयारी करून ठेवली आहे. विशेषत: करोना परिस्थितीत रुग्णालयांचा विद्युतपुरवठा खंडित होऊ नये व तेथील प्राणवायुपुरवठा यंत्रणाही सुरळीत राहील यासाठी प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना बैठकीत दिली. तौक्ते वादळाच्या पार्श्वभूमीवर पश्चिम किनाऱ्यावरील राज्यांची बैठक अमित शहा यांनी रविवारी दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतली. महाराष्ट्र, गुजरातचे मुख्यमंत्री तसेच दादर नगर हवेलीचे प्रशासक यांच्याकडून तयारीचा आढावा घेतला. चक्रीवादळात नुकसान होऊ नये म्हणून राज्य शासनाने केलेल्या तयारीची माहिती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिली. रुग्णालयांचा वीजपुरवठा खंडित होणार नाही तसेच पर्यायी (बॅकअप) यंत्रणा लगेच कार्यान्वित होईल व रुग्णांच्या उपचारांत अडथळा येणार नाही यासाठी सावध राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जम्बो व इतर कोविड केंद्रे ही पावसापासून संरक्षण करणारी असली तरी मोठे वादळ झाल्यास समस्या उद्भवू शकते, हे लक्षात घेऊन सावधगिरी म्हणून मुंबई तसेच इतरत्रही या केंद्रांतील रुग्णांना दुसऱ्या ठिकाणी हलविण्यात आले आहे. सध्याच्या काळात प्राणवायूची गरज लक्षात घेता सागरी किनाऱ्यांवरील प्राणवायू उत्पादन करणाऱ्या प्रकल्पांमधील उत्पादन व वाहतूक सुरळीत सुरू राहील यासाठी नियोजन केले आहे तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस यांना विविध ठिकाणी तैनात करण्यात आले आहे. किनाऱ्यांवरील कच्च्या घरांतील लोकांना दुसरीकडे हलविण्यात आल्याचेही ते म्हणाले. मंत्रालय नियंत्रण कक्ष सज्ज असून इतरही जिल्ह्यांतील नियंत्रण कक्षांशी त्यांचा समन्वय आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.



## संपादकीय...

# डिजिटल जाहिरातींचे युग

आंतरजालावर (इंटरनेट) विखुरलेल्या आपल्या खासगी विदेचा (पर्सनल डेटा) सर्वात प्रभावी वापर जाहिरात क्षेत्राकडून केला जातो. संगणकाच्या तसेच फोनच्या ब्राऊजरवर वेब सर्फिंग करत असताना किंवा स्मार्टफोनवरील एखादे उपयोजन (अ‍ॅप) वापरताना बऱ्याचदा आपल्यावर जाहिरातींचा भडिमार केला जात असतो. २०१५ सालापासून, विशेषत: स्मार्टफोन्सच्या उदयानंतर ऑनलाइन जाहिरातींची आर्थिक उलाढाल कैक पटींनी वाढली आहे. २०२० मध्ये, केवळ एका वर्षांत जगभरातील विविध कंपन्यांकडून आंतरजालावरील जाहिरातींसाठी तब्बल ३३ हजार कोटी अमेरिकी डॉलर्स एवढा खर्च करण्यात आला; ज्यातील स्मार्टफोनवरील जाहिरातींचा हिस्सा ६० टक्क्यांपेक्षा अधिक, जवळपास २० हजार कोटी अमेरिकी डॉलर्स


टीम बर्नर्स-ली

एवढा होता. यावरूनच या क्षेत्राच्या प्रचंड प्रमाणात वाढलेल्या व्याप्तीचा अंदाज येऊ शकेल. आंतरजालावर एखादी जाहिरात आपल्या डोळ्यांसमोर आणण्यामागे जाहिरातदाराचा प्राथमिक उद्देश हा आपल्याला त्या कंपनीचे संकेतस्थळ (वेबसाइट) उघडण्यासाठी प्रवृत्त करण्याचा असतो. त्यामुळेच दाखवलेली जाहिरात ही त्या व्यक्तीची गरज किंवा आवडीनिवडी ओळखून दाखवण्यात आली आहे का, याला फार महत्त्व प्राप्त होते. सामान्यत: आपल्या गरजांशी संपूर्णत: असंबंधित जाहिरातीच्या मागे जाण्याची आपली सुतराम शक्यता नसते. जरा विचार करा.. समजा, मी एक अविवाहित, बँकेत नोकरी करणारा तरुण आहे. जर मला लहान मुलांच्या संगोपनासंबंधातील जाहिरात दाखवली गेली, तर त्यात मला रस असण्याची कितपत शक्यता आहे? याउलट समजा, मी माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात व्यवस्थापकपदावर काम करणारी एक मध्यमवयीन स्त्री आहे. मला एक आठ वर्षांची मुलगी आणि १२ वर्षांचा मुलगा आहे. अशा परिस्थितीत माझ्या डोळ्यांसमोर जर लहान मुलांना सॉफ्टवेअर कोडिंगचे ऑनलाइन धडे देणाऱ्या कंपनीची जाहिरात आली, तर त्यांच्या अभ्यासक्रमाबद्दल अधिक जाणून घेण्याची उत्सुकता मला नक्कीच वाटू शकेल.

कोविडोत्तर कालखंडात जरी ई-व्यवहारांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले असले, तरी बऱ्याच जणांसाठी ती एक तडजोड आहे. हॉटेलमधील जेवण, कपडे, फर्निचर किंवा दागिन्यांची खरेदी यांसारख्या अनेक गोष्टी आहेत, ज्यांच्या खरेदीचा प्रत्यक्ष अनुभव घेणे आपण अधिक पसंत करतो. अशा कंपन्यांच्या ऑनलाइन जाहिरातींत व्यक्तीच्या भौगोलिक स्थानाला फार महत्त्व प्राप्त होते. नागपूरमध्ये राहणाऱ्या व्यक्तीच्या ब्राऊजरवर मुंबईतील हॉटेल किंवा दुकानांची जाहिरात करून काय फायदा?

थोडक्यात, जर जाहिरातदार कंपनीला त्यांच्या उत्पादनाबद्दल अधिक माहिती मिळवण्यासाठी मला उद्युक्त करायचे असेल, तर माझी वैयक्तिक माहिती, भौगोलिक स्थान, आवडीनिवडी, सामाजिक स्थिती, राजकीय मते अशा अनेक गोष्टींचा अभ्यास करून त्यानुसार जाहिराती दाखवणे भाग आहे. रेडिओ, टेलिव्हिजन यांवर जाहिराती दाखवताना कंपन्यांना केवळ ढोबळमानाने काही निकष तयार करणे शक्य असते. उदाहरणार्थ, टीव्हीवरील दैनंदिन मालिका गृहिणी वा ज्येष्ठ नागरिक बघत असण्याची शक्यता अधिक असते, त्याचप्रमाणे कार्टून वाहिन्यांचा प्रेक्षक हा साधारणपणे लहान मुले व त्यांच्या आयांपुरता सीमित असतो. त्यामुळे या वेगवेगळ्या दर्शकवृंदाशी संबंधित जाहिराती त्या-त्या कार्यक्रमांदरम्यान दाखवण्यात येतात. पण या माध्यमांवर जाहिराती दाखवताना प्रेक्षकांच्या आर्थिक, सामाजिक, भौगोलिक स्थितीनुसार जाहिराती बदलता येत नाहीत. त्यामुळेच एखादे कुटुंब मुंबईतील उच्चभ्रू वसाहतीत राहणारे असो किंवा नंदुरबारमधील एखाद्या आदिवासी पाड्यावर राहणारे असो, दोन्ही कुटुंबांना एका वाहिनीवर एका वेळी सारखीच जाहिरात दिसत असते. आंतरजालावर मात्र वरील सर्व मर्यादा साफ नाहीशा होतात. कोणताही ई-व्यवहार करताना, संकेतस्थळांना भेट देताना, विविध उपयोजनांचा (अ‍ॅप्स) वापर करताना किंवा समाजमाध्यमी मंचांवर व्यक्त होत असताना आपल्याबद्दलची वैयक्तिक विदा (डेटा) आपल्या कळत-नकळत तयार होत असते. तिची आंतरजालावर कायमस्वरूपी साठवणही होत असते. या अविरतपणे तयार होत असलेल्या आणि अमर्यादित प्रमाणात कायमस्वरूपी साठवल्या गेलेल्या आपल्या व्यक्तिगत माहितीचा आपल्याला आंतरजालावर कोणत्या जाहिराती दिसाव्यात आणि कोणत्या दिसू नयेत हे ठरवण्यासाठी कसा वापर करतात, हे समजून घेणे उद्बोधक आहे.

# दिल्ली चौथ्या लाटेच्या मध्यावर

दिल्लीतील करोनाची 'चौथी लाट' आटोक्यात येण्याची शक्यता दिल्ली सरकारला दिसू लागली आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल सातत्याने लोकांना करोनासंदर्भातील माहिती देत असल्याने राज्य सरकारचे म्हणणे काय आहे, हे निदान समजू शकते. करोनामुळे मुख्यमंत्र्यांचा हा संवाद बहुतांश वेळेला एकतर्फी असल्याने एखाद्या मुद्द्यावर प्रसारमाध्यमांना तातडीने स्पष्टीकरण मिळत नाही. त्यातून विरोधी पक्षांना केजरीवाल सरकारवर टीका करण्याची संधी मिळते. गेल्या महिन्याभरात भाजपने केजरीवाल सरकारला धारेवर धरलेले आहे. दिल्ली उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात दिल्लीतील प्राणवायू पुरवठ्यावरून घमासान झाल्यानेही भाजप आम आदमी पक्षाच्या सरकारविरोधात अधिक आक्रमक झालेला दिसला. पण हा सगळा वाद-प्रतिवाद होत असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे अस्तित्व दिसले नाही. दिल्लीत यापूर्वी तीनदा करोनाचा आलेख उंचावला व मंदावला, त्या तीनही करोना लाटांच्या वेळी साथ आटोक्यात आणण्यासाठी शहांनी प्रशासकीय हस्तक्षेप केला होता. यंदाच्या चौथ्या लाटेत मात्र शहा गायब होते. दिल्लीतील चौथ्या आणि देशभरातील दुसऱ्या लाटेत केंद्र सरकारचे नेतृत्वच टीकेचे लक्ष्य झाल्यानेही कदाचित शहांनी दिल्लीकरांसमोर येण्याचे टाळले असावे.

खरे तर दिल्ली आता अप्रत्यक्षपणे शहांच्या अधिकार कक्षेत आलेली आहे. 'दिल्ली सरकार म्हणजे नायब राज्यपाल' हा प्रशासकीय अधिकारातील मोठा बदल करणारा कायदा दिल्लीत लागू झालेला आहे. नायब राज्यपालांच्या परवानगीशिवाय लोकनियुक्त दिल्ली सरकारला कोणत्याही निर्णयाची अंमलबजावणी करता येत नाही. नायब राज्यपाल हे केंद्र सरकारनियुक्त. दिल्लीवर खरे राज्य केंद्र सरकारचे असल्याने राजधानी परिक्षेत्रातील परिस्थितीची जबाबदारी दिल्ली सरकारप्रमाणे केंद्र सरकारच्याही खांद्यावर येऊन पडलेली आहे. अशा वेळी 'चाणक्या'ने दिल्लीतील करोना परिस्थितीत हस्तक्षेप करू नये, हे आश्चर्यकारक म्हणता येईल.

**प्राणवायू-वादाची 'दुसरी फेरी'**

दिल्लीतील प्राणवायूची गरज आता कमी झाली असल्याने 'अतिरिक्त' प्राणवायू दुसऱ्या राज्यांना दिला तरी चालेल, असे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी केंद्राला कळवले आहे. त्यावरून प्राणवायूच्या पुरवठ्यावरून वादाची दुसरी फेरी खेळली जात आहे. प्राणवायू पुरवठ्याचा तुटवडा हा राज्य सरकारांच्या नियोजनाच्या अभावाने झाल्याचा आरोप भाजपने केलेला आहे. भाजपकडून होणारी ही टीका फक्त दिल्ली सरकारपुरती सीमित नव्हती. दिल्लीतील प्राणवायू पुरवठ्याचा मुद्दा अधिक चर्चिला गेला कारण न्यायालयांनी केंद्र आणि राज्य या दोन्ही सरकारांना जबाबदार धरले होते. न्यायालयांमध्ये केंद्राच्या वतीने झालेल्या युक्तिवादांत प्राणवायू पुरवठ्यातील तुटवड्यासाठी राज्य सरकारच कारणीभूत असल्याचा दावा केला गेला होता. त्याचा आधार घेऊन भाजपने दिल्ली सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. भाजपच्या नेत्यांचे म्हणणे असे की, दिल्ली सरकारने प्राणवायूच्या गरजेसंदर्भात न्यायालयांमध्ये केलेले दावे निखालस खोटे होते. दिल्ली सरकारने ७०० मेट्रिक टन प्राणवायूची गरज असल्याचे सांगितले. मग आता करोनाचे रुग्ण वाढल्यावर प्राणवायूची मागणी कमी कशी झाली? केंद्र सरकारने आधीच न्यायालयांमध्ये स्पष्ट केले होते की, दिल्लीची गरज सुमारे ७०० मे. टनाची नाही तर, सुमारे ५००-५५० मे. टन इतकीच आहे. केंद्र सरकारचा दावा योग्य होता असे आता सिद्ध होत आहे, असे भाजप नेत्यांचे म्हणणे आहे. भाजप नेत्यांना टीका करण्याची संधी सिसोदिया यांनी मिळवून दिली. दिल्ली सरकारची प्राणवायूची गरज सुमारे ५८० मे. टन इतकीच असून शिल्लक प्राणवायू अन्य राज्यांना दिला जावा वा दिल्लीसाठी हरियाणा-उत्तर प्रदेश राज्यांनी राखीव ठेवावा, असे दिल्ली सरकारचे म्हणणे आहे. दिल्लीत एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून करोनाच्या ताज्या तडाख्याने हाहाकार माजवला होता. दिल्लीतील दोन मोठ्या रुग्णालयांमध्ये प्राणवायूच्या कमतरतेमुळे रुग्णांचा मृत्यू झाला होता. प्राणवायूच्या सिलिंडरची साठमारी सुरू होती. रुग्णांना उपचारासाठी खाटा उपलब्ध नाहीत, म्हणून रुग्णालये रुग्णांना दाखल करून घेऊ शकत नव्हती. रुग्णांचे उपचाराअभावी मोटारींत, रिक्षांमध्ये, रुग्णवाहिकेत मृत्यू झाले. दैनंदिन रुग्णवाढ आणि मृत्यू दोन्हीत झपाट्याने वाढ होत होती. दिल्लीत इतकी अनागोंदी होती की, दिल्ली उच्च न्यायालयाला आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला. दिल्ली उच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान दिल्ली सरकारने ७०० मे. टन प्राणवायूची मागणी असून केंद्राकडून फक्त ५००-५५० मे. टन प्राणवायूचा पुरवठा होत असल्याचा आरोप केला गेला. त्यासाठी न्यायालयात अन्य



राज्यांना होत असलेल्या प्राणवायू पुरवठ्याची आकडेवारीही सादर केली गेली, त्याची दखल सर्वोच्च न्यायालयातही घेण्यात आली होती. दिल्ली सरकारने दाखवलेल्या कथित बेफिकिरीबद्दल न्यायालयांनी ताशेरे ओढले; पण केंद्र सरकारलाही जबाबदार धरले. राजधानीत रुग्ण उपचारासाठी वणवण करत असताना केंद्राने हस्तक्षेप का केला नाही, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने विचारला होता. प्राणवायू पुरवठ्याची दिल्ली सरकारची मागणी का पूर्ण केली गेली नाही, दिल्ली सरकारने प्राणवायूचा दिलेला कोटाही वापरला नाही तर केंद्राने ही जबाबदारी का स्वीकारली नाही, असेही न्यायालयाने विचारले होते. दिल्लीला ७०० मे. टन प्राणवायूची गरज नसल्याचे केंद्राच्या वतीने न्यायालयात स्पष्ट करण्यात आले होते. पण, न्यायालयात राजकीय प्रत्युत्तर देता येत नसल्याने भाजपने न्यायालयाबाहेर केजरीवाल सरकारवर टीकेच्या फैरी झाडल्या. दिल्ली सरकारवर भाजपकडून आत्ता होत असलेल्या आरोपांना ही न्यायालयीन पार्श्वभूमी आहे.

**रुग्णवाढ सध्या कमी..**

१७ एप्रिल रोजी दिल्लीत सुमारे ७५ हजार उपचाराधीन रुग्ण होते तेव्हा ७०० मे. टनाची मागणी केली गेली, गेल्या आठवड्यात सुमारे ८३ हजार उपचाराधीन रुग्ण असताना दिल्ली सरकारची प्राणवायूची मागणी ५८२ मे. टन कशी झाली? रुग्ण कमी होते तेव्हा मागणी जास्त आणि रुग्ण वाढूनही मागणी कमी, असे व्यस्त गणित दिल्ली सरकारने कसे मांडले, हा भाजपच्या नेत्यांचा सवाल आहे. पण, १६ मे रोजी दिल्लीतील उपचाराधीन रुग्णांची संख्या सुमारे ६६ हजार होती. संसर्गदर ३६ टक्क्यांवरून ११ टक्क्यांवर आलेला आहे. दिल्ली सरकारच्या संकेतस्थळावरील आकडेवारी पाहिली तर अतिदक्षता विभागातील खाटा तसेच प्राणवायू पुरवठ्याची सुविधा असलेल्या खाटांच्या संख्येत तुलनेत वाढ झालेली दिसते. या संकेतस्थळावरील माहितीनुसार, १६ मे रोजी दिल्लीतील रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभागात ६९० खाटा उपलब्ध होत्या. प्राणवायूची सुविधा असलेल्या उपलब्ध खाटांची संख्या आठ हजार होती. महिन्याभरानंतर दिल्लीतील करोनाच्या परिस्थितीत थोडीफार सुधारणा होऊ लागल्याचे दिसत आहे. त्यामुळे कदाचित प्राणवायूच्या मागणीत घट झाली असण्याची शक्यता आहे.

दिल्लीत १६ मे रोजी सुमारे साडेसहा हजार रुग्ण करोनाबाधित झाले, २० एप्रिल रोजी २८ हजार करोनाबाधित झाले होते. दैनंदिन रुग्णसंख्या कमी होत असली तरी गेल्या वर्षी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये दिल्लीत आलेल्या तिसऱ्या लाटेत दैनंदिन रुग्णसंख्या आठ हजारांनी वाढत होती. म्हणजे आत्ता दिल्लीने तिसऱ्या लाटेतील शिखर गाठले आहे. संसर्गदर ३६ टक्क्यांवरून ११ टक्क्यांपर्यंत खाली आलेला आहे. गेल्या सहा दिवसांमध्ये हा दर १९.२० टक्क्यांवरून ११.३२ टक्क्यांवर आलेला आहे.

अर्थात, संसर्गदर पाच टक्के वा त्यापेक्षा कमी होणे गरजेचे असल्याचे केंद्रीय आरोग्य विभागाचे म्हणणे आहे. महिन्याभराच्या निर्नायकीनंतर दिल्ली सरकार सावध पावले उचलू लागले असल्याचे दिसते. दिल्लीतील टाळेबंदी आणखी एक आठवड्याने वाढवण्यात आली आहे. करोनासंदर्भातील 'एकात्मिक नियंत्रण कक्ष' सुरू करण्यात आला आहे, त्याद्वारे दिल्ली सरकारला रुग्णालय, प्राणवायू आणि लसीकरणाची एकत्रित अद्ययावत माहिती उपलब्ध मिळू शकेल. प्राणवायूची समस्याही सोडवण्याचाही प्रयत्न केला जात आहे. मोठ्या रुग्णालयांमध्ये प्राणवायू उत्पादक संयंत्रे बसवली जात आहेत.

# अशोक चव्हाण निष्क्रिय आणि नाकर्ते; सदाभाऊ खोत यांचा जोरदार हल्लाबोल



कोल्हापूर : रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष आणि माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी काँग्रेस नेते आणि कॅबिनेट मंत्री

अशोक चव्हाण यांच्यावर जोरदार टीका केली आहे. 'अशोक चव्हाण म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणातील मुख्यमंत्रिपदावरुन कोतवाल बनलेले राजकारणी आहेत, ते मराठा समाजातील प्रस्थापितांचे सरदार आहेत, निष्क्रिय, नाकर्ते आहेत, त्यांची लायकी वेड्याच्या हॉस्पिटलमध्ये जाण्याची आहे. त्यांच्याकडून तातडीने मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्षपद काढून घ्या,' असा घणाघात सदाभाऊ खोत यांनी केला आहे.

'राज्यात प्रस्थापित आणि विस्थापित असे मराठा समाजात दोन गट आहेत. यातील प्रस्थापित राजकारण्यांना मराठा समाजाला आरक्षण द्यायचे नाही. अनेक वर्षे राज्यात प्रस्थापित मराठा नेत्यांची सत्ता आहे, त्यांनी कधीच मराठा समाजाला आरक्षण दिले नाही. उलट सारथी संस्था कोणी बंद पाडली. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ राज्य नियोजन मंडळात विलीन करण्याचे कारण काय?' असा सवाल सदाभाऊ खोत यांनी केला आहे.


'मराठा आरक्षणसंबंधी महाविकास आघाडी सरकार पहिल्यापासून बेफिकीर आहे. वास्तविक सरकारने वकिलांची फौज नेमून कायदेशीर बाजू भक्कमपणे मांडायला हवी होती. पण तसे झाले नाही.

उलट मराठा समाजाच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रयत्न सुरू आहे. राज्यपाल आरक्षण देणार नाहीत, हे त्यांना माहीत आहे. तरीही ते राज्यपालांना भेटतात. त्यांना देवाच्या आळंदीला जायचेच नाही, ते सारे चोरांच्या आळंदीला जाणारी नेते आहेत. अनेक जण मराठा समाजाचे नाव घेऊन सरदारकी भोगत आहेत, हे सरदारच मराठा आरक्षणातील अडसर आहेत. त्यांना पायउतार करावेच लागेल. जोपर्यंत ते पायउतार होणार नाहीत, तोपर्यंत मराठा आरक्षण मिळणे कठीण आहे,' असं म्हणत सदाभाऊ खोत यांनी महाविकास आघाडी सरकारवर निशाणा साधला आहे.

मंत्री अशोक चव्हाण यांच्यावर खोत यांनी जोरदार हल्ला चढवला.

ते म्हणाले, चव्हाण यांना आदर्श कारभारामुळे घरी जावे लागले होते . दोन वर्षे ते मराठा आरक्षणाचे ज्या पद्धतीने काम करत होते ते काम पाहता अफूच्या गोळ्या खाऊन काम करत होते का अशी शंका येते. त्यांना आता वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये भरती करण्याची वेळ आली आहे. कारण भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्यावर ते ज्या पद्धतीने टीका करत आहेत, ते पाहता काम न करणाऱ्या या निष्क्रिय नेत्याला आता उपसमितीचे अध्यक्ष पद देणे चुकीचे आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याकडून ते तातडीने काढून घ्यावे, अशी मागणी सदाभाऊ खोत यांनी केली आहे.

# धक्कादायक! अल्पवयीन मुलाला चोरी करताना एका मुलाने पाहिले, अन्...




आपल्या चोरीचे बिंग फुटू नये म्हणून एका अल्पवयीन मुलाने ११ वर्षीय मुलाची गळा चिरून हत्या केली. शेवगाव तालुक्यातील खुंटेफळ येथे हे घटना घडली. पोलिसांनी अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे.

सोमवारी (१० मे) सार्थक आंबादास शेळके (वय ११) याची घरातच गळा चिरून हत्या झाली होती.

याचे गूढ उकलण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना अखेर यश आले. एका अल्पवयीन मुलाने ही हत्या केल्याचे उघड झाले. घरात कोणी नसल्याचे सांधी साधून हा मुलगा चोरी करायला गेला होता. तेवढ्यात सार्थक तेथे आला. आपली चोरी पकडले गेल्याचे लक्षात आल्यावर त्या मुलाने सार्थकची गळा चिरून हत्या केली. त्याने यापूर्वीही शेळके यांच्या घरात अनेक चोरी केल्याचे तपासात उघड झाले आहे, अशी माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अनिल कटके यांनी दिली.

त्या दिवशी सार्थकचे वडील अंबादास शेळके कुटुंबासमवेत घराबाहेर काम करत होते. सार्थक आणि त्याचा लहान भाऊही त्यांच्यासोबत होता. घरापासून काही अंतरावर असलेल्या वाडग्यात नवीन घराचे काम सुरू होते. दुपारी चारच्या सुमारास सार्थकच्या वडिलांनी त्याला घरी जाऊन मोबाईल घेऊन येण्यास सांगितले. त्यानुसार सार्थक घरी गेला. मात्र, बराच वेळ झाला तरी तो परत आला नाही. त्यामुळे त्याच्या लहान भावाला काय झाले ते पहाण्यासासाठी पाठविले. त्याने घरी जाऊन पाहिले असता सार्थक रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. त्याच्या मानेवर वार केलेला दिसून आला. शेळके यांनी शेजाऱ्यांच्या मदतीने सार्थकला रुग्णलयात नेले. मात्र, त्यापूर्वीच तो मृत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# करोनाबाधित कैद्यांनी साधली संधी; कोविड सेंटरच्या खिडकीचे गज तोडून फरार



कोल्हापूर: करोनाचा अहवाल पॉझिटिव्ह आल्यानंतर उपचार घेत असलेल्या दोन कैद्यांनी रात्री उशिरा कोविड सेंटरमधून धूम ठोकली. खिडकीचे गज कापून पळालेले हे दोन कैदी दरोडा आणि खुनाच्या गुन्ह्यात अटक होते.

याबाबत अधिक माहिती अशी, कळंबा कारागृहातील अनेक कैद्यांना करोनाची लागण झाली होती. या कैद्यावर आयटीआय वस्तीगृहातील करोना सेंटरमध्ये उपचार सुरू आहेत. सध्या येथे ९१ कैद्यांवर उपचार सुरू असून हे सर्व कैदी विविध गुन्ह्यात शिक्षा भोगत आहेत.

काल रात्री १२ नंतर दोन कैद्यांनी खिडकीचे गज कापून तेथून पलायन केले. यामध्ये एक कैदी दरोडा प्रकरणात तर दुसरा खुनाच्या प्रकरणात शिक्षा भोगत होता.

गेल्या तीन वर्षापासून हे कैदी कारागृहात होते. गोदाजी नंदिवाले व प्रतीक सरनाईक अशी या कैद्यांची नावे आहेत. रात्री उशिरा ते गज कापून पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना इतर कैद्यांना त्याची कुणकुण लागली. त्यामुळे त्यांनी आरडाओरड सुरू केली. पण तोपर्यंत दोन्ही कैदी पळाले. बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी त्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. पण, अंधाराचा फायदा घेऊन ते पळून गेले.

याबाबत जुना राजवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्हीही कैदी हे कोल्हापूर जिल्ह्यातील असून त्यांचा पोलिस शोध घेत आहेत. राज्यात करोनाचा संसर्ग वाढत असताना कोल्हापूरातही करोनाचा प्रादुर्भाव वाढला आहे. विशेष, म्हणजे कोल्हापूरातील कारागृहातही करोनानं शिरकाव केला आहे.

त्यामुळं अनेक कैद्यांना करोनाची लागण झाली आहे. या कैद्यांवर कोव्हिड सेंटरमध्ये उपचार सुरु आहेत. मात्र, उपचार सुरु असताना कैद्यांचे पलायन करण्याची घटना धक्कादायक आहे, असं मत व्यक्त करण्यात येत आहे. राज्यातील इतर जिल्ह्यातही कैद्यांनी पलायन केल्याचं समोर आलं आहे.

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मंगळवार १८ ते २४ मे २०२१


# भाईंदरच्या भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात ऑक्सिजन जनरल प्लांटचे उद्घाटन

## कोरोना बाधित लहान मुलांसाठी तयार करण्यात आलेल्या विशेष वॉर्डची पालकमंत्री एकनाथ शिंदेंकडून पाहणी






भाईंदर येथे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात उभारण्यात आलेल्या ऑक्सिजन प्लांटचे राज्याचे नगरविकास तथा ठाणे जिल्हा पालकमंत्री ना. मा. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज उद्घाटन झाले. विशेष म्हणजे, सिलेंडरचा वापर न करता रुग्णांच्या बेडला पाईपलाईन लावून थेट ऑक्सिजन पुरविता येईल. एकाचवेळी 110 रुग्णांना ऑक्सिजन पुरविता येण्याची क्षमता यात आहे. कोरोनामुळे ऑक्सिजनची कमतरता भासत असल्याने ठिकठिकाणी ऑक्सिजन जनरेशन प्लांट उभारण्यात येत आहेत.कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेसाठी संपूर्ण आरोग्य सुविधा सक्षम करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत असल्याचे श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. संभाव्य तिसऱ्या लाटेत लहान मुलांना सर्वाधिक संसर्ग होण्याच्या पार्श्वभूमीवर विशेष टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये बालरोगतज्ज्ञ आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश आहे. भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात कोरोना बाधित लहान मुलांसाठी विशेष वॉर्ड तयार करण्यात आला आहे. कोरोना विषाणूची सध्यस्थिती पाहता प्रशासनाच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. यासोबतच, पावसाळ्यात होणाऱ्या साथीच्या आजारांकडे दुर्लक्ष करता



येणार नसून त्यासाठी सर्व यंत्रणांना सज्ज राहण्याचे श्री. शिंदे यांनी यावेळी आदेश दिले. राज्यातील राज्यातील निर्बंध १ जूनपर्यंत वाढवण्यात आले असून 'ब्रेक द चेन' च्या आदेशाचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे, अशा सूचनाही श्री. शिंदे यांनी यावेळी दिल्या. पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात




210 ऑक्सिजन खाटा व 40 आयसीयू खाटा कार्यन्वित आहेत. सद्यस्थितीत 6K L क्षमतेचा लिक्विड मेडिकल ऑक्सिजन टँक व 352 जम्बो सिलेंडरद्वारे ऑक्सिजन पुरवठा करण्यात येत आहे. सदर प्लांट हा स्वयंचलित असल्याने यासाठी मनुष्यबळाचा वापर अगदी कमी होतो. तसेच, मेडिकल लिक्विड ऑक्सिजन टँक रिफिलिंग करताना व जम्बो सिलेंडर्स हाताळणी करताना होणारे अपघात या प्लांटमध्ये होत नाहीत, अशी माहिती श्री. ढोले यांनी दिली. 'म्युकर मायकोसिस' रोगाचा प्रादुर्भाव कोरोना रूग्णांमध्ये वाढत असल्याने या त्यासाठीचा औषधसाठा तसेच तज्ञ डॉक्टरांशी सल्लामसलत करून आवश्यक तयारी केली असल्याचे महापालिकेचे आयुक्त श्री. दिलीप ढोले यांनी सांगितले. म्युकर मायकोसिसाठी लागणाऱ्या औषधांचा पुरवठा देखील जिल्हाधिकाऱ्यांमार्फत होईल, असेही श्री. ढोले यांनी नमूद केले. महानगरपालिकेच्या सर्व 8 रुग्णालयांचे ऑक्सिजन, फायर, स्ट्रचतुरल,इलेक्ट्रिकल ऑडिट पूर्ण झाले असून खाजगी 47 रुग्णालयांचे फायर व थर्ड पार्टी ऑक्सिजन ऑडिटचे काम पूर्ण झाले आहे, असेही श्री. ढोले यांनी सांगितले. यावेळी खासदार श्री. राजन विचारे, आमदार श्रीमती. गीता जैन, मीरा भाईंदरच्या महापौर श्रीमती. ज्योत्स्ना हसनाळे, श्री. उपमहापौर हसमुख गेहलोत, आयुक्त श्री. दिलीप ढोले, उपायुक्त संभाजी वाघमारे, पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते, सभागृह नेते श्री. प्रशांत दळवी, स्थायी समिती सभापती श्री. दिनेश जैन, पंडित भीमसेन जोशी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक गीते तसेच सर्वपक्षीय नेते आणि मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## बालरोग तज्ज्ञांच्या टास्क फोर्सची स्थापना






# टेम्पोच्या धडकेत टायर बदलणाऱ्या क्लिनरचा मृत्यु; दोघे जखमी




ठाणे : कॅडबरी ब्रिज येथे आपल्या ट्रकचा टायर बदलणाऱ्या शमलाल सरबजीत हरजन (३७, रा. मुलुंड, मुंबई) याला टेम्पोने जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये त्याचा मृत्यु झाल्याची घटना शनिवारी रात्री घडली. याप्रकरणी टेम्पो चालक प्रथमेश कळजुनकर (२७) याच्याविरुद्ध नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.मुलूंड येथील रहिवाशी अरविंद वर्मा (२९) आणि त्यांच्यासोबत असलेले क्लिनर शमलाल हे त्यांच्या ट्रकचा मागील टायर फुटल्यामुळे तो १५ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास बदलत होते. त्याचवेळी ठाणे ते मुंबईकडे जाणााऱ्या मार्गावरुन आलेल्या एका टेम्पोची त्यांना जोरदार धडक बसली. यात शमलाल हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने कळवा येथील ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, शमलाल यांचा मृत्यु झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. दरम्यान, टेम्पो चालक प्रथमेश कळजुनकर आणि शमलाल यांचे सहकारी वर्मा हे दोघेही या अपघातामध्ये किरकोळ जखमी झाले आहेत. कळजुनकर याच्याविरुद्ध नौपाडा पोलीस ठाण्यात कलम ३०४ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस उपनिरीक्षक सुरज जोंधळे हे अधिक तपास करीत आहेत.

# आजोबांनी पाहिलं तर काय नात पंख्याला लटकलेली; लग्नाच्या वरातीऐवजी तिची निघाली अंत्ययात्रा



राजधानी हरमाडा भागात एका युवतीने घरात फास लावून आपले जीवन संपवले. सकाळी मृताच्या आजोबांनी पाहिले तेव्हा ही तरूणी पंखावर लटकलेली आढळली आहे. या प्रकरणाची माहिती मिळताच हरमाडा पोलिस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी मृतदेह खाली काढून ताब्यात घेतला आणि हा मृतदेह कांवटिया रुग्णालयात शवविच्छेदनसाठी पाठवला. मिळालेल्या माहितीनुसार मृताचे नाव पूजा कुमावत असे आहे. मृतक आपल्या आजोबांजवळ राहत होता. आजारपणामुळे तिचे पालक आधीच मरण पावले आहेत. मृत मुलीचा साखरपुडा झाला होता. २६ मे रोजी लग्न ठरले होते. मृत मुलीच्या लग्नाची वरात निघण्याऐवजी अंत्ययात्रा निघाली. मात्र, आत्महत्येमागील कारण पुढे आले नाही.या प्रकरणाचा तपास हरमाडा पोलीस करत आहेत. इकडे या घटनेनंतर मृताच्या नातेवाईकांना अश्रू अनावर झाले आहेत. त्यांना समजत नाही की ज्या मुलीची मुलगी 10 दिवसानंतर लग्नासाठी वरात निघणार होती; तिची अंत्ययात्रा निघत आहे. त्याचबरोबर मृताच्या सासरच्या लोकांमध्येही शोकाचे वातावरण आहे.

# नागपूर एमआयडीसीतील हत्याकांडाची मास्टरमाइंड नात गजाआड



नागपूर : एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या विजयाबाई पांडुरंगजी तिवलकर (वय ६५) यांच्या हत्येचा कट रचणारी आरोपी तनु काळे हिला तिच्या प्रियकरासह गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सोमवारी पहाटे अमरावतीला ताब्यात घेतले. मृत विजयाबाई यांची तनु ही नात होय. विजयाबाई एसआरपीएफच्या निवृत्त कर्मचारी होत्या. त्यांना एक मुलगा आणि दोन मुली असून तिघांचेही लग्न झाले आहे. हे तिघेही नागपुरातच वेगवेगळ्या ठिकाणी आपल्या परिवारासह राहतात. वृद्ध विजयाबाई सप्तक नगरात एकट्या राहायच्या. त्यांच्या मुलीची मुलगी तनू स्वैर वागत होती. तिने आपल्या आईवडीलांचे घर सोडले होते. ती मित्रांसोबत राहायची. अधूनमधून आजी विजयाबाई यांच्याकडे यायची.

आजी निवृत्त सरकारी कर्मचारी असल्याने तिच्याकडे १० ते १५ लाख रुपये आणि दागिने असल्याचा अंदाज मिनुने बांधला होता. ती एकटीच असल्याने तिचा गेम करून रोकड तसेच दागिने लुटता येईल, आजूबाजूला सीसीटीव्ही वगैरे काही नसल्याने आपले पाप कुणाच्या लक्षात येणार नाही, असे तनूला वाटत होते. आपले अवाजवी खर्च भागविण्यासाठी आजीची हत्या करण्याचा कुविचार तिच्या मनात आला. त्यानुसार तिने प्रियकर फैजानच्या मदतीने कट रचला. त्यात फैजानचे साथीदार नीलेश प्रकाश पौनीकर, बाबा उर्फ कदिर खान, फरदीन खान आणि आरजू उर्फ मोहम्मद कमरे आलम यांना सहभागी करून घेतले. १० ते १५ लाख रुपये मिळणार म्हणून आरोपी त्यात सहभागी झाले आणि गुरुवारी मध्यरात्री त्यांनी विजयाबाईच्या गळयावर गुप्तीचे घाव घालून त्यांची हत्या केली.पोलिसांनी शनिवारी रात्री बाबा, नीलेश पौनिकर आणि फरदीन खान तसेच आरजूला पकडले. तर रोकड, दागिन्यांसह पळून गेलेल्या तनू आणि तिचा प्रियकर फैजानला अमरावतीला सोमवारी पहाटे ताब्यात घेतले.

# बीकेसी कोविड सेंटरला तौक्ते वादळाचा तडाखा, पालिकेने रातोरात रुग्णांना हलवल्याने अनर्थ टळला



अरबी समुद्रात तयार झालेले तोत्के चक्रीवादळ आता मुंबईच्या किनारपट्टीवर घोंघावत आहे. तोत्के चक्रीवादळ मुंबई महाराष्ट्राच्या दिशेने सरकत असताना प्रशासाने सर्व यंत्रणांना अलर्ट कलेले होते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत तयार करण्यात आलेल्या बीकेसी कोविड सेंटरला या चक्रीवादळामुळे सुटलेल्या वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. परंतु पालिकेच्या प्रसंगावधानामुळे कोविड सेंटरमधील रुग्णांना दुसऱ्या रुग्णालयात हलविल्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. मुंबईत सकाळीपासून वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. जोरदार वारे वाहत असल्यामुळे बीकेसी केविड सेंटरचा काही भाग उखडला गेला आहे.

मुंबईत तयार करण्यात आलेल्या बीकेसी कोविड सेंटरमध्ये मोठ्या संख्येने कोरोना रुग्णांवर उपचार करण्यात येत होता. तसेच नागरिकांचे कोरोना लसीकरणही याच ठिकाणी करण्यात येत होते. परंतु हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजामुळे आणि वादळी वाऱ्याचा विचार करता मुंबई महानगर पालिका आयुक्त इक्बाल चहल यांनी तेथील कोरोना रुग्णांना इतर ठिकाणी हलवण्याचा निर्णय घेण्यात आला. मुंबई महानगर पालिकेने मुंबई, दहीसरमधील कोविड सेंटरमधील ५८१ रुग्ण इतर रुग्णालयात दाखल केले आहेत. बीकेसी कोविड सेंटरला वादळी वाऱ्याचा मोठा तडाखा बसला आहे. यो कोविड सेंटरचे टेंट वाऱ्यामुळे उखडले गेले आहेत. काही भागाचे छप्पर उडाले आहे. कोविड सेंटरमधील कर्मचारी अधिक नुकसान होऊ नये यासाठी कोविड सेंटरमधील वस्तू बाजूला काढून ठेवत आहेत. पालिकेने बीकेसी कोविड सेंटरमधील २४३ रुग्णांना नेस्को आणि अन्य रुग्णालयात दाखल केले आहे. तर दहिसरमधील १८४ रुग्णांना नेस्को, अंधेरी, मरोळ इतर रुग्णालयात दाखल केले आहे. मुलूंडमधील १५४ रुग्णांना मीठाघर तसेच जकात नाका येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मुंबईत तयार करण्यात आलेले कोविड सेंटर हे एखाद्या टेंट सारखे होते.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898